# STUDY OF ECONOMIC & SOCIAL PROBLEMS OF TRIBAL WOMEN IN NAXAL AFFECTED DEORI TALUKA

SUMMERY OF
MINOR RESEARCH PROJECT
SUBMITTED TO
UGC : WESTERN REGIONAL OFFICE
GANESH KHIND , POONA UNIVERSITY CAMPUS
POONA - 4111007 (MAHARASHTRA)

BY :-

VARSHA MANOHARRAO GANGNE
(PRINCIPAL INVESTIGATOR)
LECTURER IN ECONOMICS
MANOHARBHAI PATEL COLLEGE OF ARTS
& COMMERCE,  DEORI - 441901, DIST. GONDIA
(MAHARASHTRA)

2012

# सारांश


आदिवासी ही एक जात नसून जमात आहे. ती प्रामुख्याने अरण्यात किंवा डोंगर कपारीत वास्तव्य करते. *'गिलिन' च्या मते - "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या स्थानिक गटांच्या समूहाला आदिवासी म्हणतात". *

आदिवासी समाज मागासलेला असून त्याच्या न्याय्य हक्कांसाठी संपूर्ण जगात लढा सुरु आहे. त्यांना आता वनवासी न म्हणता "अनुसूचित जमाती" म्हंटले जाऊ लागले आहे. जगात २७% इतकी आदिवासींची लोकसंख्या आहे. भारतात ती ७% आहे. एकटया महाराष्ट्रात २३ लक्ष आदिवासी आहेत. त्यापैकी गोंदिया जिल्हयात ७,३१८ इतकी आदिवासींची संख्या (२००१ च्या जणगणनेनूसार) असून त्याचे शे. प्रमाण २.०८% इतके आहे. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे असलेले प्रमाण १८.३६% आहे. ७,३१८ या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ३,७१८ पुरुष तर ३,६०० स्त्रिया आहेत. देवरी तालुक्यात ५१,५४२ इतकी अनूसूचित जमातीची लोकसंख्या असून त्यापैकी २६,४०१ पुरुष व २५,१४१ स्त्रिया आहेत.

➢ **आदिवासी जमातींचे अध्ययनासाठी चार गटात विभाजन केले जाते.**

१) पूर्णतः वन्य अवस्थेत असलेले आदिवासी.
२) अर्धवन्य अवस्थेत असलेले आदिवासी.
३) अर्धवट सुधारलेले व शेती करणारे आदिवासी.
४) पूर्णतः नागरी संस्कृतीत मिसळलेले आदिवासी.

श्रमविभाजनामूळे स्त्री व पुरुष हे दोन भागात विभाजित झाले व इथूनच आदिवासी स्त्रियांना दुय्यमपणाची वागणूक मिळू लागली.

आदिवासी समाजात मुलींचे जीवन स्वच्छंद, मुक्त आणि आनंदी स्वरुपाचे आहे. मुला-मुलींमध्ये फरक केला जात नाही. म्हणूनच इतर समाजांच्या तुलनेत आदिवासी समाजात स्त्री-पुरुष प्रमाणात विशेष अंतर दिसून येत नाही. आदिवासी स्त्रियांच्या लोकगीतातून त्यांच्या संस्कृतीची ओळख होते. आदिवासी स्त्री अत्यंत साधी, सरळ, संकोची, निसर्गावर प्रेम करणारी, रुढी व परंपरा मानणारी आहे. कुटुंब आणि त्यातील सदस्यांना ती अत्यंत महत्व देते. मर्यादित गरजा, समाधानी वृत्ती, आनंदी व साधी राहणी, श्रमाला महत्व व धार्मिकपणा ही आदिवासी स्त्रियांची वैशिष्टये आहेत.

आधुनिक काळात आदिवासी स्त्रियांचे राहणीमान खान-पान, विचार, वागणूक इ. व संस्कृतीकरणामूळे बदल होत आहेत. शैक्षणिक स्तर हळूहळू सुधारत आहे. त्यामूळे त्यांचे राहणीमान बदलेले आहे. असे असले तरी आदिवासी स्त्रियांसमोर अनेक आर्थिक व सामाजिक समस्या आहेत, ज्या त्यांच्या विकास मार्गातील अडथळे ठरतात.

देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे हे संशोधनाचे व सदर विषय निवडण्याचे प्रमुख कारण आहे. अध्ययनासाठी १९९८-२००८ हा दहा वर्षांचा मर्यादित कालावधी निवडण्यात आला असून नमूना निवड पद्धतीचा उपयोग अध्ययनासाठी केला आहे. संशोधनाचा आराखडा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक असून आदिवासी स्त्रियांच्या समस्यांवर निदान

सूचविण्याचा प्रयत्न निष्कर्षांच्या आधारे करण्यात आलेला आहे. अनुसूची, प्रश्नावली, मुलखाती चर्चा, संवाद इ. प्राथमिक स्त्रोत तसेच दुय्यम स्त्रोतांद्वारे समस्यांविषयी माहिती मिळविण्यात आली. व तथ्ये गोळा करण्यात आली.

आज बदलाच्या उंबरठयावर आदिवासी स्त्री उभी आहे. याचा परिणाम तिच्या अस्तित्वावर निश्चितच होत आहे. देवरी तालुक्यातील निवडक २०० आदिवासी स्त्रियांच्या अध्ययनावरुन सदर संशोधन कार्य करण्यात आले.

*जगाच्या पाठीवर जवळ जवळ सर्वच देशात आदिवासी जमातींचे वास्तव्य दिसून येते. भारतात ४१४ आदिवासी जमाती आहेत. तर महाराष्ट्रात ४८ आदिवासी जमाती आहेत. शहरी संस्कृती आणि आदिवासी जमातींमध्ये फार दुरावा असल्याने त्या विकासापासून वंचित राहिल्या आहेत. एकूण लोकसंख्येपैकी ७% असलेले आदिवासी आदिम अवस्थेत असावेत, असे म्हणणे अन्यायकारक आहे. विकासाच्या प्रक्रियेत एकाचा विनाश तर दुसऱ्याचा विकास अशी विकासनिती दिसून येते.*

आदिवासी स्त्रियांचा बाह्य जगाशी संपर्क न आल्याने त्यांची विशेष प्रगती झालेली नाही. इतर जमातींपेक्षा आदिवासी जमातीत स्त्रियांना सन्मानाचे स्थान व सामाजिक स्वातंत्र्य आहे. कौटुंबिक पातळीवर ती मातृसत्ताक पद्धतीत वावरणारी स्त्री आहे. आधुनिक काळात आदिवासी स्त्रिया अर्थार्जन करु लागल्या आहेत. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. स्त्रियांच्या सामाजिक व इतर समस्यांसोबत आर्थिक समस्या प्रमुख आहेत. शासकीय योजनांमुळे आदिवासी मुली शिक्षण घेऊ लागल्या आहेत. तर काहीनी गगनभरारी घेतली आहे.

आदिवासींच्या प्रश्नावर अनेक अभ्यासकांनी व संशोधकांनी अध्ययन केले आहे. आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक व धार्मिक प्रश्नांवर मोठया प्रमाणात अभ्यास झालेला आहे. पण आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास फारसा झालेला दिसून येत नाही. पूर्व महाराष्ट्रातील गोंदिया जिल्हयात आदिवासी जमातींचे प्रमाण अधिक आहे. या जमातीत स्त्री-पुरुष प्रमाण जवळजवळ सारखेच दिसून येते. देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे स्वरुप जाणून घेण्यासाठी जिल्हयातील २० गावांची निवड करण्यात आली असून त्यातील प्रत्येकी १० अर्थात एकूण २०० स्त्रियांचा अभ्यास मुलाखती, चर्चा, प्रश्नावली, अनुसूची इत्यादींचा माध्यमातून करण्यात आला. व निष्कर्ष काढण्यात आले.

आदिवासी स्त्रिया विकासाच्या प्रवाहापासून बऱ्याच लांब आहेत. गैरआदिवासी स्त्रियांप्रमाणेच आदिवासी स्त्रियांच्या काही समस्या सारख्याच आहेत. पण आदिवासी स्त्रियांच्या काही समस्या वेगळ्या आहेत. आदिवासी स्त्रियांना काही विशेष समस्यांचा सामना करावा लागतो. भारतात जवळजवळ ७% आदिवासी अजूनही मागासलेल्या अवस्थेत असलेले दिसून येतात.

आदिवासी स्त्रियांना अनेक आर्थिक व सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यापैकी काही प्रमुख पुढील प्रमाणे सांगता येतील.

**अ) आर्थिक समस्या –** आदिवासी स्त्रियांच्या इतर सर्व समस्यांचे मूळ कारण आर्थिक समस्या आहेत. आर्थिक समस्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

I) कृषीविषयक आर्थिक समस्या. II) औद्योगिक आर्थिक समस्या. III) रोजगारविषयक आर्थिक समस्या. IV) विकासा संबंधी आर्थिक समस्या. V) इतर समस्या.

**ब) सामाजिक समस्या –** समाजातील नियम व मान्यतांमूळे या समस्या निर्माण होतात. काही ठळक सामाजिक समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

I) सांस्कृतिक समस्या. II) धार्मिक समस्या. III) आरोग्यविषयक समस्या. IV) शैक्षणिक समस्या. V) सवलतींविषयक समस्या. IV) इतर

आदिवासी स्त्रियांना वरिल सर्व समस्यांशिवाय नक्षलवादाशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ग्रामिण क्षेत्रातील आदिवासी स्त्रियांना असुधारित व्यवस्थेमूळे अनेक समस्यांचा सामना करावा लागतो तर शहरी संपर्कातील स्त्रियांना लैंगिक शोषण, दुय्यम वागणूक, उपेक्षित घटक, फसवणूक यासारख्या समस्यांचा सामना करावा लागतो.

आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांमूळे त्यांच्या विकासाच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण होतात.

## ❖ आर्थिक व सामाजिक समस्यांचे परिणाम :–

आदिवासी स्त्रियांना अनेक आर्थिक व सामाजिक समस्यांचा सामना करावा लागत असल्यामूळे त्यांच्या जीवनावर याचे अनेक परिणाम होतात. जसे –

१) आर्थिक व सामाजिक विषमता. २) राहणीमानाचा निम्न स्तर. ३) उपेक्षित वागणूक. ४) विकास मार्गात अडथळे. ५) गैरमार्गाचा अवलंब. ६) गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ. ७) मुल्यविहिन समाजाची निर्मिती. ८) न्यूनगंड व उदासिनतेत वाढ. ९) द्वेष व मत्सर वाढतो. १०) क्रांतीची ठिणगी.

आदिवासी स्त्रियांना धर्मांतराच्या समस्येमूळे त्यांच्या मुल्यांपासून दूर जावे लागत आहे. अंधश्रद्धा, काळीजादू, मृत्यूसंस्कार इ. मूळे आदिवासी स्त्रिया रोज नविन समस्यांना बळी पडतात. त्यामूळे या समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे.

आदिवासी समाज हा इतर समाजाच्या तुलनेत मागासलेला समाज आहे. पण असे असले तरी काही बाबतीत तो इतर समाजापेक्षा पुढे आहे. उदा. स्त्री-पुरुष प्रमाणात समानता किंवा स्त्री भृणहत्येचा अभाव. आदिवासी स्त्रिया वृक्षपूजा, सूर्यपूजा, पर्वतपूजा इ. ना विषेश महत्व देतात. यांची जीवनपद्धती स्वतंत्र असून ते समान सांस्कृतिक जीवन जगतात. आदिवासी समाजाचे नियम व कायदे जात पंचायतीद्वारे तयार केलेले असतात त्यांचे पालन न झाल्यास कठोर शिक्षा, दंड किंवा बहिष्कृत करण्याच्या पद्धती आढळून येतात.

आदिवासी समाजात ‘गोंड’ या जमातीचे प्राबल्य असून गोंडाची वैभव गाथा अनेक लेखकांच्या लिखाणातून वाचावयास मिळते. पूर्व विदर्भात गोंडाचे राज्य असल्याचे पूरावे अजूनही बघायला मिळतात.

आदिवासी जमातीत मातृसत्ताक कुटुंबपद्धती पूर्वी मोठया प्रमाणात अस्तित्वात होती. पण आता इतर समाजाच्या संपर्कात आल्यामूळे पितृसत्ताक कुटुंबपद्धती दिसून येते.

आदिवासी स्त्रिया आभूषणप्रिय आहेत त्यामूळे त्या विविध अलंकार अंगावर घालतात. नृत्य करतांना अनेक वादयांचा प्रयोग केला जातो. ही वादये ते स्थानिक वस्तूपासून स्वतः तयार करतात. आदिवासी समाजात मृत्यूसंस्कार व जन्मसंस्कार या दोन्ही प्रसंगी मांसाहार व मदयप्राशन करणे आवश्यक समजले जाते. जादू, भानामती, अतिमानवी शक्ती, तांदळी विधी, चेटूक इ. वर आदिवासी समाजाचा अधिक विश्वास आहे. स्त्रिया अंधश्रद्धा, भगत पौर्णिमा अमावस्या इ. ना खूप महत्व देतात.

आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था प्राथमिक स्वरुपाची दिसून येते. अनियमित रोजगार, स्थायी रोजगार संधीचा अभाव, अपूरे वेतन, हंगामी कामांवर चरितार्थ चालविणे, बाजारपेठांचा अभाव, वनसंपत्तीला अत्यंत कमी दाम मिळणे, अप्रगत आर्थिक व्यवहार इ. या अर्थव्यवस्थेची वैशिष्टये म्हणता येतील थोडक्यात अर्थव्यवस्था निर्वाहापुरती सिमित म्हणजे निर्वाह प्रधान असल्याचे दिसून येते.

आदिवासी समाजात लिखित साहित्यांचा अभाव दिसून येतो. लोकगीते, स्त्रीगीते, समूहगीते, रामलीला, तमाशे, महाभारतातील नाटयप्रयोग, उत्सवगीते इ. पाठांतर करुन एका पिढीद्वारे दुसऱ्या पिढीकडे वारसारुपाने हस्तांतरित होते. हिंदू संस्कृतीपेक्षा आदिवासी संस्कृती अनेक बाबतीत वेगळी असल्याचे अभ्यासकांनी नमूद केले आहे.

काळाच्या प्रवाहात आदिवासी स्त्रिया विकासाच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या जीवनशैलित परिवर्तन झाले आहे. निर्वस्त्र राहणारी आदिम स्त्री अंगभर कपडे घालू लागली आहे. डोंगरकपारीतील स्त्रिया व मुली शिक्षण घेऊ लागल्या आहेत. अनेक मुली शिक्षणसोयींचा लाभ घेत आहेत. स्त्रियांना आपल्या अस्तित्वाची व विकासाची जाणिव होऊ लागले आहे. थोडक्यात परिवर्तनाच्या वाटेवरुन आदिवासी समाज हळूहळू पुढे-पुढे प्रवास करीत चालला आहे.

आदिवासी जमातीत निम्मी लोकसंख्या असलेला 'स्त्री' या घटकाचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जातात. त्यांचा कमी अधिक प्रमाणात फायदा होत असलेल्या दिसून येतो.

आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करतांना असे दिसून आले कि, अजूनही निरक्षरता, आरोग्य सोयींचा अभाव, त्यांचा पूरेसा वापर न करणे, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा व दैववादी प्रवृत्ती, धर्मांतर यासारख्या सामाजिक समस्या तर गरिबी राहणीमानाचा निम्न स्तर, कुपोषण, अनियमित रोजगार, आर्थिक फसवणूक, कमी आर्थिक मोबदला, वेठबिगारी यासारख्या आर्थिक समस्या मोठया प्रमाणात अस्तित्वात आहेत. एकूण आदिवासी स्त्री लोकसंख्येपैकी ७२% स्त्रिया ३० ते ४५ या वयोगटातील आहेत. त्यामूळे कामकरी लोकसंख्या अधिक पण कामाच्या संधी त्या तुलनेत कमी अशी स्थिती दिसून येते.

आदिवासी स्त्रियांचा विकास साधणे, त्यांना प्रगतीच्या प्रवाहात आणणे, समाजाचा एक सामान्य घटक म्हणून ओळख मिळवून देणे यासाठी शासनातर्फे विविध प्रयत्न केले जात आहेत. आदिवासी विकास महामंडळ, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत व केंद्रस्तरावर अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. यात काही नविन योजनांचा समावेश करण्यात आला आहे. जसे-माहेर योजना, सबला योजना इ.

शासकीय योजनांच्या लाभामूळे शेतमजूर ते हवाई सुंदरी हा प्रवास त्यांना करणे शक्य झाले आहे. शाळेत मुलींची संख्या वाढणे, गळती कमी होणे, रोजगाराच्या संधी निर्माण होणे इ. वरुन शासकीय योजनांचे यश स्पष्ट होते. पण, अजूनही या योजना पूरेशा प्रमाणात यशस्वी झालेल्या नाहीत. कारण योजनांचा लाभ केवळ २५% आदिवासी स्त्रियांना झाला आहे. तर २०% योजना परत जातात व ५५% लाभ गैरआदिवासी घेतात. यावरुन योजना अपेक्षित प्रमाणात यशस्वी झाल्या असे म्हणता येत नाही.

योजनांच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष, स्त्रियांच्या वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक समस्या, नक्षलवादाचे दडपण व भय इ. मूळे शासकीय योजनांना पूर्णपणे यश आलेले नाही.

## ❖ निष्कर्ष :–

देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक समस्यांचे सुक्ष्म अध्ययन केल्यानंतर तसेच तथ्य संकलन केल्यानंतर अध्ययनावरुन काही निष्कर्ष काढण्यात आले.

- जगाच्या पाठीवर सर्वच देशातील आदिवासी जमाती विकासाच्या प्रक्रियेत खुप मागे असल्याचे दिसून आले. देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या विकास अत्यंत कमी प्रमाणात झाल्याचे दिसून आले.
- आदिवासी जमातीत स्त्रियांना समानतेचा दर्जा दिला जात असल्याचे दिसून आले. अनेक कुटुंबात मातृसत्ताक पध्दती दिसून आली.
- देवरी तालुक्यात एकूण लोकसंख्येत स्त्री-पुरुष प्रमाणात अत्यंत कमी अंतर असल्याचे दिसून आले. यावरुन स्त्री-पुरुष समानता आदिवासी समाजात असल्याचे दिसून आले. आधुनिक काळात ही एक जमेची बाजू आहे.
- देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक समस्या निर्माण होण्यामागे शिक्षणाचा अभाव हे ठळक कारण असल्याचे दिसून आले.
- देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रिया अत्यंत गरीब असल्याचे अध्ययनावरुन स्पष्ट झाले.
- देवरी तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक समस्येच्या अध्ययनात गैरआदिवासींकडून तसेच सुधारणावादी समाजाकडून स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळत असल्याचे दिसून आले.
- एकेकाळी शासक आदिवासी जमातीतील स्त्रिया काळाच्या प्रभावात अंधार युगाकडे लोटल्या जात असल्याचे स्पष्ट झाले. देवरी तालुक्यात १९९१ च्या तुलनेत २००१ च्या जनगणनेत कमी झालेली आदिवासी स्त्रियांची संख्या याचा पुरावा आहे.
- शासकीय योजनांचा पुरेसा लाभ आदिवासी स्त्रियांना होत नाही असे अध्ययनात दिसून आले. केवळ १० टक्के स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ झाला आहे असे लक्षात आला.
- महाराष्ट्र शासनाद्वारे आदिवासी स्त्रियांसाठी अनेक योजना देवरी तालुक्यात राबविल्या जात असल्याचे दिसून आले.
- आदिवासी स्त्रियांच्या सर्व समस्यांचे मूळ कारण आर्थिक समस्या असल्याचे अध्ययनावरुन स्पष्ट झाले.

## ❖ शिफारसी :–

- सिंचन सोयींचा विकास करणे
- भारनियमन कमी केले जावे
- फिरत्या शाळांची स्थापना करण्यात यावी
- स्थानिक व्यवसायांना चालना देण्यात यावी
- मोठा औद्योगिक प्रकल्प स्थापित करणे
- हस्तकलेस प्रोत्साहन व वाव दिला जावा

- कागदपत्रे उपलब्ध करुनं देण्याची सोय करण्यात यावी
- रोजगार हमी योजनेत स्त्रियांना प्राधान्य दिले जावे
- सांस्कृतिक कलांना आर्थिक मोबदला मिळवून देणे
- स्त्री संघटना स्थापन केल्या जाव्यात
- मध्यस्थांचे उच्चाटन केले जावे
- विकासाचे प्रयत्न गतीशील केले जावे
- शासन दारी येणे गरजेचे
- औद्योगिक विकासास चालना देण्यात यावी
- बचतगटांचे कार्यक्षेत्र वाढविले जावे
- विशेष प्रयत्नांची गरज
- स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य दिले जावे
- पर्यटन स्थळांचा विकास केला जावा
- संघटीत बाजारपेठांची स्थापना
- उद्बोधन वर्ग व कार्यशाळांचे आयोजन केले जावे
- योजनांच्या कार्यपध्दतीत सुलभता आणली जावी
- स्थानिक उद्योजकांनी पुढाकार घ्यावा

## अ) मराठी संदर्भग्रंथ सूची –


१) डॉ. आगलावे, प्रदिप - 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे', २०००, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) आत्राम, व्यकंटेश - 'गोंडी संस्कृतीचे संदर्भ', २००७, मासिक, जयसेवा प्रकाशन, नागपूर.

३) भांडारकर, पु.ल., 'सामाजिक संशोधन पद्धती', १९९९, पिपंळापुरे प्रकाशन, नागपूर.

४) बोधनकर, सुधिर, डॉ. बेहरे सुमन - 'सामाजिक संशोधन पद्धती', १९९३, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) डॉ. देवगावकर, एस.जी - 'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती', डिसेंबर २००९, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.


## ब. हिंदि संदर्भग्रंथ सूची –


१) कुमरे, मंसाराम - 'प्रधान आदिवासी सभ्यता', २००७, जयसेवा प्रकाशन, नागपूर.

२) प्रा. शोभनाथ - 'भिल्लों के बीच बीस वर्ष', १९८६, प्रभात प्रकाशन, दिल्ली.

३) डॉ. पिंगले, भिमराव - अनुवाद, जमादार ए.एच. 'आदिवासी एवं उपेक्षित जन', १९९६, विकास प्रकाशन, कानपूर.


## क. इंग्रजी संदर्भ सूची –

**List of English Reference Books.**


1) Dr. Deogaokar, S.G – 'Tribal Dance & Song', 2003, Concept Publication Co. ,New Delhi.
2) Kurwe, Irawati – 'Hindu social organization', 1956, Popular Book Depot, Bombay.
3) Malli, Gandi – 'Development of Denotified Tribes – Policy & Practice, 2006, Sarup & Sons Publications, New Delhi.
4) Prasad, S.S. – 'Tribal woman', Laboures aspect of Economic & Physical Exploitaion', 1988, Gain Publishing House, New Delhi.
5) Patil, R.N. & Jen B. – 'Tribal Development in India', Ashish Publishing House, Punjab Bag, New Delhi.